आयुर्वेदाला विश्वस्तरावर पोहोचवण्याचं काम भारतीय युवा आयुर्वेदिक चिकित्सक करतील >> पान 2

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांनी राज्याचे वातावरण खराब केले : खासदार राऊत यांची टिका >> पान 3

भाजापाचे काही नेतेच देवेंद्र फडणवीसांची तुलना क्रूरकर्मा औरंगजेबाशी करत आहेत >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**

सुख आणि दुःख हे नाण्याच्या दोन बाजू आहेत.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई



सहज ऑडिशन द्यायला गेली अन् आयपीएलची सर्वात सुंदर अँकर बनली, पुढे घटस्फोटीत अभिनेत्याशी लग्नही उरकलं

आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 214 ■ मंगळवार, दि. 18 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## हिवरा आश्रम येथे २४ मार्च रोजी एक दिवसीय विश्वस्त परिषदेचे आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याच्या अनुषंगाने सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बुलढाणा विभागामार्फत जिल्ह्यातील विश्वस्तांसाठी एक दिवसीय विश्व्वस्त परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या १३ जानेवारी रोजीच्या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्र्यांनी क्षेत्रीय शासकीय व निमशासकीय कार्यालयांसाठी १०० दिवसांच्या कृती आराखड्याच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

या अनुषंगाने या एक दिवसीय विश्वस्त परिषदेचे आयोजन करण्यात आले असून ही परिषद स्वामी विवेकानंद आश्रम, हिवरा आश्रम येथे २४ मार्च रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत होणार आहे.

या परिषदेस जिल्ह्यातील विश्वस्त, विधीज्ञ आणि पक्षकारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बुलढाणा विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

## तहसिल कार्यालयात १९ मार्चला जागतिक ग्राहक दिन




**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा पुरवठा कार्यालय व तहसिल कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ग्राहक दिन साजरा केला जाणार असून यानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी १९ मार्च रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, बुलढाणा येथे पार पडणार आहे.

या कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी शरद पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी गजानन टेकाळे, तहसीलदार व्ही.एस. कुमरे आणि निरीक्षण अधिकारी निलीमा उरकुडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ग्राहकांच्या हक्कांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी महायुतीचे उमेदवार जाहीर

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी महायुतीचे उमेदवार जाहीर झाले आहेत. विधानपरिषदेच्या पाच पैकी तीन जागांसाठी भाजपनं काल उमेदवार जाहीर केले होते. आज राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेनं उमेदवार जाहीर केले आहेत. शिवसेनेनं चंद्रकांत रघुवंशी आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं संजय खोडके यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. भाजपकडून संदीप जोशी, संजय केनेकर आणि दादाराव केचे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. या पाच जागांची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता आहे.**



महाराष्ट्राच्या विधानपरिषदेतील आमदार विधानसभा निवडणुकीत विजयी झाल्यानं त्या जागा रिक्त झाल्या होत्या. शिवसेनेचे आमशा पाडवी, राष्ट्रवादीचे राजेश विटेकर आणि भाजपचे प्रवीण दटके, गोपीचंद पडळकर आणि रमेश कराड हे विधानसभा निवडणुकीत विजयी झाल्यानं त्यांचं परिषेदतील सदस्यत्व संपुष्टात आलं होतं. या रिक्त जागांसाठी विधानपरिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला होता.

विधानपरिषदेच्या रिक्त जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. उद्या (१८ मार्च) ला अर्जांची छाननी होईल. त्यानंतर २० मार्चपर्यंत अर्ज मागं घेण्याची मुदत आहे. तर, मतदानाची तारीख २७ मार्च आहे. मात्र, पाचपेक्षा अधिक अर्ज आले नाहीत तर निवडणूक बिनविरोध होऊ शकते.

महाराष्ट्राच्या विधानपरिषदेची सदस्यसंख्या ७८ इतकी आहे. विधानसभेप्रमाणं परिषद दर ५ वर्षांनी भंग होत नाही. विधानपरिषदेच्या सदस्यांचा कार्यकाळ ६ वर्षांचा असतो. ७८ सदस्यांपैकी ३० सदस्य विधानसभेच्या आमदारांकडून निवडले जातात. २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींकडून मतदानाद्वारे निवडून दिले जातात. तर, शिक्षकांमधून ७ आमदार, पदवीधरांमधून ७ आमदार निवडले जातात. तर, राज्यपाल साहित्य, कला, सहकार आणि सामाजिक सेवा यातून १२ आमदारांची नियुक्ती करतात.

विधानपरिषदेत पाच जागांची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी ७८ पैकी ५२ सदस्य आहेत. यामध्ये ३२ आमदार महायुतीचे आहेत. तर, महाविकास आघाडीकडे १७ आमदार आहेत. भाजपचे १९, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे ६ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे ७ आमदार आहेत. तर, महाविकास आघाडीच्या १७ मध्ये काँग्रेसचे ७, शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडे ३ आणि ठाकरेंच्या शिवसेनेकडे ७ आमदार आहेत.तर, तीन अपक्ष आमदार आहेत.

दरम्यान, विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली असली तर विरोधी पक्षांनी मात्र उमेदवार देण्याचं धाडस दाखवलेलं नाही. याचं कारण विधानसभेत महाविकास आघाडीच्या घटकपक्षांच्या आमदारांची संख्या कमी आहे. त्यामुळं उमेदवार दिला तरी यश मिळणार नसल्याची खात्री असल्यानं महाविकास आघाडीनं या निवडणुकीसाठी उमेदवार जाहीर केलेला नाही.

## लाडकी बहीण योजनेचे पैसे दारुवर उडवले; जाब विचारणाऱ्या बायकोवरच कोयत्याने हल्ला, गुन्हा दाखल

**दैनिक आपला विदर्भ**

**सोलापूर/प्रतिनिधी :** राज्य सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना विधानसभा निवडणुकीत निर्णयात्मक ठरली. लाडक्या बहिणींमुळे राज्यात महायुतीचं सरकार बहुमताने प्रस्थापित झाल्यान महायुतीमधील तिन्ही पक्षाचे प्रमुख समाधानी आहेत. मात्र, लाडकी बहीण योजनेची स्क्रुटीन सुरू करण्यात आली असून फोर व्हिलर असलेल्या कुटुंबातील महिलांची नावे वगळण्यात येत आहेत. आत्तापर्यंत विविध कारणास्तप या योजनेतील ९ लाखांहून अधिक महिलांना अपात्र करण्यात आलं आहे. एकीकडे ही योजना महिलांना आर्थिक बळ देत असल्याने योजनेचं कौतुक होत असताना, दुसरीकडे या योजनेतून महिलांना मिळणाऱ्या पैशांची मागणीही काही दारुड्या नवऱ्यांकडून महिलांना होत आहे. त्यातून घरगुती कलही निर्माण झाल्याचं पाहायाला मिळत आहे. सोलापूर जिल्ह्यातील माढ्यात अशीच एक घटना घडली असून याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

## लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, पण तिच्यात दुरुस्ती होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** लाडक्या बहिण संदर्भात आम्हाला आपुलकी आहे. पण, काहींची गांडूळासाखी अवस्था आहे, ते कोणत्या तोंडाने चालतं हे कळत नाही. पाच वर्षाचा वचननामा असतो, ऋतो आम्ही देणार आहोत. तुम्ही तर कोर्टात गेले होते, तुम्ही तर चुनावी जुमला म्हणाले. आम्ही दोन शासन निर्णय काढले. लाडक्या बहिणींचे वय ६० ऐवजी ६५ केले. घाईगडबडीत काही भगिनींची अर्थिक परिस्थिती चांगली आहे, पंतप्रधान यांनी ही गॅस संदर्भात आवाहन केल्यानंतर लोकांनी परत केले होते, असे उदाहरण अजित पवारांनी दिले. तसेच, लाडकी बहीण या योजनेत आम्ही दुरुस्ती करणार मात्र बंद करणार नाही, असेही सांगितले.

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सांगता होत असताना सभागृहात विरोधकांच्या प्रश्र्नांना उत्तरे दिली. हे मला भाषणातून मारत होते, पण मी गप बिचारा ऐकत होतो. मी गरीब असल्याने इकडे बसलोय, असे म्हणत भाषणाच्या सुरुवातीलाच अजित पवारांनी विरोधकांना टोला लगावला. मग आता समोरच्या बाकावर बसलेल्या सन्माननीय सदस्यांनी ठरवायचे आहे की, मागील पाच वर्षात राज्याने प्रगती केली की, आपलं राज्य मागे गेले? आमचे तरी म्हणणे आहे की, राज्य मागील पाच वर्षात पुढेच गेलेले आहे. त्यातही मागील दोन वर्षात प्रगतीचा वेग अधिक होता, असे अजित पवारांनी म्हटले. तसेच , राज्यातील महायुती सरकारला लोकांनी भरभरुन प्रेम दिलं असून महायुती भक्कम आहे. पुढील पाच वर्षे या सरकारला ब्रम्हदेव आला तरी धक्का लावू शकत नाही, असेही अजित पवारांनी भाषणातून सभागृहात ठणकावून सांगितले.

## नागपूरमध्ये दगडफेक, परिसरात तणावाचं वातावरण!

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूरमध्ये दगडफेकीची घटना घडली आहे. या घटनेमुळे सध्या नागपुरात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. विशेष म्हणजे या दगडफेकीमुळे नागपुरातील शिवाजी चौकाला छावणीचं स्वरुप आलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार जमावाने काही गाड्यांना आगदेखील लावली आहे. पोलीस जमावाला पांगवण्याचा प्रयत्न करत आहेत. सोबतच जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांकडून अश्रूधुराचा वापर केला जात आहे. पोलिसांनी ठिकठिकाणी बॅरिकेड्स लावले आहेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून कसोशीने प्रयत्न केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार संध्याकाळी सात ते साडेसातच्या दरम्यान मोठ्या संख्येने एक गट शिवाजी चौकाच्या जवळ पोहोचला होता. या गटाने घोषणाबाजीला सुरुवात केली. घोषणाबाजी सुरू होताच परिसरातील दुसऱ्या गटानेही घोषणाबाजी सुरू केली. त्यानंतर पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घोषणाबाजी



करणाऱ्या दोन्ही गटांना वेगवेगळे केलं. त्यानंतर पोलिसांनी सर्वांना शिवाजी चौकावरून चिटणीस पार्कच्या दिशेने मागे ढकलले.

मात्र चिटणीस पार्कच्या पलीकडे भालदारपुरा परिसरातून मोठ्या प्रमाणावर पोलिसांवर दगडफेक सुरु झाली. पोलिसांनी बळाचा वापर करून स्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र मोठ्या आकाराचे दगड पोलिसांच्या दिशेने भिरकावले जात असल्यामुळे पोलिसांकडून अश्रूधुराच्या नळकांड्या वापरून जमावाला नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. दगडफेकीमध्ये काही गाड्यांचे नुकसानही झाल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार जमावाने एका क्रेनलाही आग लावली आहे. पोलिसांच्या दिशेने दगड आणि विटा भिरकावल्या जात आहेत. मात्र पोलीस जमावावर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.

या घटनेनंतर मुख्यमंत्री तसेच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरकरांना शांतता राखण्याचं आवाहन केलं आहे. नागपुरातील महाल परिसरात दगडफेक आणि तणावपूर्ण स्थिती निर्माण झाल्यावर पोलीस प्रशासन परिस्थिती हाताळत आहेत. या परिस्थितीत नागरिकांनी प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

आपण सातत्याने पोलिस प्रशासनाशी संपर्कात असून, त्यांना नागरिकांनी सहकार्य करावे. नागपूर हे शांतताप्रिय आणि एकमेकांच्या सुखदुखा:त सहभागी होणारे शहर आहे. ही नागपूरची कायम परंपरा राहिली आहे. अशावेळी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नका आणि प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

# औरंगजेबाच्या कबरीचे उदात्तीकरण चालणार नाही; देवेंद्र फडणवीस यांची भूमिका

## शिवरायांच्या मंदिराला तीर्थस्थळाचा दर्जा देण्याची घोषणा

**ठाणे/प्रतिनिधी :** क्रूरकर्मा मुघल सम्राट औरंगजेबची कबर कायमची नेस्तनाबूत करावी, ती महाराष्ट्रातून कायमस्वरूपी हटवावी या मागणीसाठी विश्र्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांकडून आंदोलन केले जात आहे. मुंबईसह राज्यभरातील जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आज बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांकडून औरंगजेबाची कबर हटविण्याची मागणी केली जात आहे. संभाजीनगर येथील औरंगजेबाची कबर हटवली नाही तर विश्र्व हिंदू परिषद कारसेवा करत स्वतः कबर हटवेल, असा इशाही सरकारला देण्यात आला आहे. त्यामुळे, शासनाकडून सध्या औरंगजेबाच्या कबरीला अधिकच संरक्षण देण्यात आलंय. याप्रकणावरुन राज्यात गदारोळ सुरू असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. भिवंडीतील मराडे पाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिर लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते झाले. त्यावेळी, येथील कार्यक्रमातून त्यांनी औरंगजेबाच्या कबरीला दुर्दैवाने संरक्षण द्यावं लागत असल्याची खंत बोलून दाखवली. मात्र, औरंग्याचं महिमामंडन होऊ देणार नाही, असं वचनही त्यांनी दिलं. छत्रपती शिवरायांनी देखील १८ पगड जातीच्या लोकांना एकत्रित केले, शेतकरी, बलुतेदार, यांना एकत्र केले, त्यांच्यात पौरुषत्व निर्माण केले. आपल्याला देव देश धर्मकारिता लढायचे आहेत, यासाठी तयार केले, हे जे बीजारोपण त्यांनी केले त्यामुळेच नंतर संभाजी महाराज राजाराम महाराज, ताराराणी यांनी स्वराज्यासाठी योगदान दिले. शिवरायांनंतर मराठ्यांनी औरंगजेबाला इथेच गाडला, मुघलांचा निःपात केला, दिल्लीवर भगवा फडकावला. त्यामुळेच, एकोप्याने राहणारा महाराष्ट्र महाराजांना अपेक्षित आहे, जातींमध्ये विभागलेला महाराष्ट्र त्यांना अपेक्षित नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले.



शिवरायांचे १२ किल्ले आहेत त्यांना जागतिक वारसा मिळावा यासाठी आपण प्रयत्न करत आहोत, मोदींनी त्यासाठी प्रयत्न केले आहेत, त्याची प्रोसेस सध्या सुरू आहे, लवकरच हा दर्जा मिळेल, असा विश्र्वास मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखवला. तसेच, संगमेश्र्वर इथे जिथे छत्रपती संभाजी महाराजांना पकडले तिथे देखील आपलं स्मारक करत आहेत. तसेच, तुळापूर इथे देखील मोठे स्मारक आपण करत आहोत. उत्तर प्रदेश सरकारला विनंती केली आहे, आग्र्याला स्मारक व्हावे म्हणून निधी दिला आहे, पानिपत इथे देखील एक स्मारक व्हावे म्हणून प्रयत्न करत आहोत, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

या ठिकाणाला तत्काळ तिर्थस्थळाचा दर्जा देण्यात येतोय. जे जे गरजेचे आहे त्याची सोय करू, पीडब्लूडी विभागाला सांगून इथे येणारे सर्व रस्ते आपण बनवू, भिवंडी वाडा रस्त्याचे काम पूर्ण करू, असे आश्र्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच इथे महिमामंडन होईल तर फक्त शिवरायांचे होईल, औरंगजेबाच्या कबरीचे होणार नाही, असा विश्र्वास व्यक्त केला. औरंगजेबाच्या कबरीला एएसआयने ५० वर्षापूर्वी संरक्षण दिले आहे, त्यामुळे महाराष्ट्र सरकारला देखील तिथे संरक्षण देणे क्रमप्राप्त आहे. मात्र, या महाराष्ट्रात औरंगजेबाच्या कबरीचे महिमा मंडन कधीच होणार नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. एक वचन तुम्हाला देतो, काहीही झालं तरी या महाराष्ट्रात औरंगजेबाच्या कबरीचे महिमामंडन होऊ देणार नाही, उदात्तीकरण होऊ देणार नाही, तसा कोणी प्रयत्न केला तर तो प्रयत्न चिरडून टाकू, हे वचन छत्रपती शिवरायांच्या मंदिरासमोर देतो, असे मुख्यमंत्र्यांनी भिवंडीतील कार्यक्रमातून ठणकावून सांगितले.

## बंधने फक्त महिलांवरच का ?

आज २१ व्या शतकात पुरुष आणि महिला असा कोणताच भेद राहिला नाही. आज महिलाही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे महिला पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे मात्र समाजात आजही असा एक घटक आहे ज्यांना महिलांची ही प्रगती खटकत आहे. आजही तो घटक महिलांना केवळ चूल आणि मूल या पुरतच मर्यादित ठेवू इच्छितो म्हणूनच हे सनातनी विचारांचे प्रतिगामी लोक महिलांना सतत या ना त्या कारणांहून ट्रोल करत असतात. कधी ते महिलांच्या केशभूषे वरून ट्रोल करतात तर कधी ते महिलांना त्यांच्या वेशभूषेवरुन ट्रोल करतात. आजच्या मुली मुलांप्रमाणे कपडे घालतात, जीन्स पॅन्ट टी शर्ट घालतात त्यांच्या जीन्स पॅन्ट गुडघ्यावर फाटलेल्या असतात याचा त्यांना राग येतो तर कधी मुलींच्या नटण्या मुरडण्याचा त्यांना राग येतो. महिलांना ट्रोल करण्यात समाजातील प्रतिष्ठित घटकही मागे नसतात. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात हे कसले संस्कार असे ? असा प्रश्न मध्यंतरी उत्तरांचलच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत विचारला होता. केवळ हेच महाशय नाही तर अनेकजण महिलांच्या वेशभूषेवरुन महिलांना टार्गेट करत असतात वास्तविक कोणी कोणते कपडे वापरायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. सार्वजनिक ठिकाणी गुडघ्यावर फाटलेली जीन्स पॅन्ट फक्त महिलाच घालतात का? पुरुषही फाटलेली जीन्स घालतात. बरमुडा किंवा शॉर्ट पॅन्ट घालून गावभर फिरतात पण त्यांच्या कपड्यावर कोणीच आक्षेप घेत नाही. म्हणजे पुरुषांनी कसलेही कपडे वापरले तरी चालेल मात्र महिलांना ते स्वातंत्र्य नाही. महिलांना मात्र त्यांच्या आवडीचे कपडे घालायला बंदी. मग प्रश्न येतो बंधने फक्त महिलांवरच का? महिलांनी कोणते कपडे घालावेत हे ठरवण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला? महिलांनी कोणते व कसे कपडे घालावेत, महिलांनी कोठे फिरावे, काय खावे, काय प्यावे हे पुरुषांनी ठरवावे ही तर अठराव्या शतकातील मानसिकता झाली. २१ व्या शतकातही महिलांना समान अधिकार मिळत नाही त्यांना त्यांच्या अधिकारासाठी झगडावे लागते ही दुर्दैवाची बाब आहे. स्त्री पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूरतीच आहे हेच या मानसिकतेतून दिसून येते. जगात एकीकडे महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठी चळवळ उभी केली जात आहे तर आपल्याकडे महिलांनी कसे राहायचे, तिने कोणते कपडे घालायचे, कसे कपडे घालायचे यावर चर्चा केली जाते. प्रश्न महिलांनी कसे आणि कोणते कपडे घालायचा हा नसून प्रश्न त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा आणि महिलांच्या मानवी हक्काचा आहे. हे हक्क कोणीही हिरावून घेऊ नये. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात, तोकडे कपडे घालतात म्हणून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होतात असा तर्क लढवला जातो. महिला संध्याकाळी बाहेर फिरायला जातात म्हणून त्यांच्यावर बलात्कार होतात असाही दावा तथाकथित संस्कृती रक्षक करतात पण ते सोयीस्करपणे हे विसरतात की आपल्या देशात अंगभर कपडे घातलेल्या साठ सत्तर वर्षाच्या वृद्धेवर देखील बलात्कार होतो. विकृत मानसिकता असलेले लोक अंगभर कपडे घातलेल्या महिलांकडे देखील विकृत नजरेने पाहतात. अंगभर कपडे असोत की तोकडे कपडे असोत ज्यांची मानसिकता विकृत आहे त्या नराधमांना महिला केवळ भोगवस्तू वाटते. महिलांच्या कपड्यांवर भाष्य करण्याऐवजी ही पुरुषी मानसिकता बदलली तर देशात महिला अत्याचाराच्या घटना घडणार नाही.

# आयुर्वेदाला विश्वस्तरावर पोहोचवण्याचं काम भारतीय युवा आयुर्वेदिक चिकित्सक करतील : केंद्रीय आयुषमंत्री जाधव







दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** भारतीय आयुर्वेदिक उपचार पद्धतीला वैश्विकस्तरावर पोहचवुन आयुर्वेदाचे ज्ञान संपूर्ण जगाला देण्याचं काम भविष्यत भारतीय युवा आयुर्वेद चिकित्सक करीत असा विश्वास केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केला.

आयुष मंत्रालयद्वारा संचालित राष्ट्रीय आयुर्वेद विद्यापीठाचा २८ वा दीक्षारंभ समारंभ आज १७ मार्च ला दिल्ली येथील विज्ञान भवन येथे केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत संपन्न झाला त्यावेळी संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते ते पुढे म्हणाले की आयुर्वेद ही भारताची पारंपारिक औषध उपचार पद्धती आहे या पद्धतीचा उपयोग आता अनेक देशांमध्ये केला जाऊ लागला आहे आयुर्वेद उपचार साईड इफेक्ट होत नसल्यामुळे अनेकांची पसंती आयुर्वेदिक उपचार पद्धतीला मिळत आहे भारतीय आयुर्वेदिक उपचार पद्धतीला विश्वस्तरावर नेण्याचं काम भारतातील युवा चिकित्सकांवर आहे हे युवा चिकित्सक भारतीय आयुर्वेदाचे ज्ञान संपूर्ण विश्वाला देण्याचे काम करतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमादरम्यान २०२४ २५ सी आर ए वी च्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले तसेच आयुर्वेद क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचाही मंत्री महोदयांच्या हस्ते गौरव करण्यात आला या कार्यक्रमाला राष्ट्रीय आयुर्वेदिक विद्यापीठातील शास्त्रज्ञ संशोधक विद्यार्थी व आयुर्वेदिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते

# नागरिकांनी फसव्या लोकांपासून सावध राहून मालमत्तेची काळजी घ्यावी

## डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्यावर आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** फसव्या लोकांपासून नागरिकांनी सावध राहावे व आपल्या मालमत्तेचे काळजी घ्यावी, मौल वस्तू सुरक्षित ठेवाव्या, असे आवाहन डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी डोणगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नागरिकांना केले आहे. ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, दिवसा घरफोडी होण्याची शक्यता नाकारत येत नाही. त्यामुळे घराला कुलूप लावून जताना घराला पडदा लावावा. सोने पॉलिश करून



देणारे कोणी फिरत असतील तर, अशा माणसाने घरामध्ये घेवू नये, असा कोणी व्यक्ती संशयित फिरत असेल तर, पोलिस स्टेशनला कळवावे. बँकेमध्ये पैसे टाकणे किंवा काढणे असल्यास आपली बॅग, पर्स, थैली कडे विशेष लक्ष ठेवावे. कुणाच्या भूल थापाना बळी पडू नये, रात्रीच्या वेळेस चोर महिलांचे आवाज काढून दरवाजा उघडण्यास सांगतात नंतर घरामध्ये प्रवेश करून चोरी करतात. आपल्या फोर व्हिलर, टू व्हिलर वाहनामधे डीकीमध्ये आपल्या मोल्यवान वस्तू ठेवू नये, कोणत्याही महाराजाची वेषभूषा असलेला किंवा अनोळखी व्यक्तीना घरामध्ये घेवू नये, बसमध्ये चढताना उतरतांना महिलांनी आपली पर्स जपून ठेवावी, तसेच पुरुषांनी आपल्या खिशामध्ये पैसे जपून ठेवावे, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नागरिकांनी आपले दुकान, घर याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावावे.असे आवाहन डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी केले आहे.

# फखरोद्दीन अली अहमद उर्दू हायस्कूल पुणे येथे विज्ञान प्रदर्शन G.M.R.T Virtual science Day मध्ये असलम खान (L.A) यांचे सहभाग

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** २८ फेब्रुवारी रोजी पुणे येथे होणाऱ्या विज्ञान प्रदर्शन ऋ.च.ठ.ढ तर्फे घेण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शन मध्ये फखरोद्दीन अली अहमद उर्दू हायस्कूल मधून असलम खान इसमतुल्ला खान (L.A) यांनी सहभाग नोंदविला होता या प्रयोग मध्ये त्यांनी केमिस्ट्री, बायलॉजी, फिजिक्स, यावर आधारित वेगवेगळे प्रयोग सादर केले होते असलम खान हे दरवर्षीप्रमाणे पुणे येथे वेधशाळा होत असलेल्या विज्ञान प्रदर्शन मध्ये स्वनिर्मिती वेगवेगळे प्रयोग त्यांनी सादर केले या प्रयोग मध्ये त्यांना उत्तम सहभाग मिळाला त्यांची दखल घेत त्यांना GMRT वेधशाळा D.A.E च्या N.C.R.- --T.I.F.R च्या नियंत्रणाखाली पुणे येथे २८ फेब्रुवारी २०२५ ला रिझल्ट देत त्यांना भारत सरकारच्या या राष्ट्रीय स्तरावरील विज्ञान प्रदर्शनातील त्यांनी केलेले मार्गदर्शनासाठी पुणे येथून त्यांना हे प्रशिस्त प्रमाणपत्र देण्यात आले असून त्यांचा गौरव करण्यात आला असून तसेच संस्था अध्यक्ष मा.राजेंद्रजी आखाडे साहेब उपाध्यक्ष. शेख नाझीम भाई कुरेशी ,सहसचिव शेख निसार भाई, कोषाध्यक्ष.किशोर भाऊ आखाडे,सदस्य,शिवचरण आखाडे,शेख शब्बीर भाई, नसीम भाई कुरेशी,शेख रफीउल्ला भाई,उमर भाई ,सर्व सदस्यगण तसेच शाळेचे प्राचार्य मो. सोहेल सर तर शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी शाळेचे नाव उज्वल केल्याबद्दल सर्वांनी असलम खान यांचे कौतुक करून आनंद व्यक्त केला.



# सहज ऑडिशन द्यायला गेली अन् आयपीएलची सर्वात सुंदर अँकर बनली, पुढे घटस्फोटीत अभिनेत्याशी लग्नही उरकलं

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतातील सर्वात लोकप्रिय असलेली लीग म्हणजेच आयपीएलला सुरुवात होऊन आता १८ वर्षे उलटले आहेत. आयपीएलचा नवा हंगाम आता २२ मार्चपासून सुरु होत आहे. दरम्यान, आत्तापर्यंत आयपीएलला अनेक निवेदक आणि निवेदिकांनी होस्ट केलेलं पाहायला मिळालं. काही अँकर त्यांच्या सुंदरतेमुळे चर्चेत राहिल्या तर काही त्यांच्या क्रिकेटबाबत असलेल्या ज्ञानामुळे देखील चर्चेत होत्या. दरम्यान, आपण आयपीएलमधील अशाच एका निवेदिकेबाबत जाणून घेऊयात, जिने टाईमपास म्हणून ऑडिशन दिली अन् आयपीएलमधील सर्वात चर्चेत असलेली अँकर बनली.


सोनी टेलिव्हिजन २०११ मध्ये आयपीएलचे निवेदन करणाऱ्या नवा चेहरा शोधत होतं. तेव्हा अभिनेत्री शिबानी दांडेकर हिला तिच्या मित्राने ऑडिशन देण्यासाठी जा, असं सांगितलं. तेव्हा बेमनमध्ये शिबानी दांडेकर ऑडिशन देण्यासाठी पोहोचली होती. तिला आपली निवड होईल, असा थोडाही आत्मविश्र्वास नव्हता. मात्र, तरी देऊन पाहूया म्हणून शिबानीने ही ऑडिशन दिली होती. मात्र ऑडिशन देऊन तिने तिचं टॅलेंट दाखवलं आणि सारेच अवाक झाले. त्यानंतर २०११ ते २०१५ दरम्यानच्या आयपीएलच्या हंगामांमध्ये शिबानीने 'एक्स्ट्रा इनिंग्स' गा शो चांगल्या पद्धतीने होस्ट केला.

शिबानी एक परफेक्शनिस्ट आहे, तिला क्रिकेटची देखील तितकीच आवड होती. मात्र, आयपीएलसारखा प्लॅटफॉर्म तिने पहिल्यांदाच होस्ट केला होता. तिने या शोसाठी मोठी मेहनत घेतली होती. त्यावेळी ती चांगल्या पद्धतीने प्रेझंट व्हावं, यासाठी प्रोड्यूसरसोबत तासंतास चर्चा करायची. शिवाय स्वत:चं ज्ञान अपडेट ठेवण्यासाठी तज्ज्ञांचं मार्गदर्शन देखील घेत होती.

# 'इनोव्हेशन' लोकोपयोगी असावे - पद्मविभूषण डॉ.अनिल काकोडकर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जगभरात अनेक प्रयोग होत असतात आणि त्यातून नाविन्यपूर्ण संकल्पना विकसित केल्या जातात. मात्र, खऱ्या अर्थाने तो प्रयोग 'लॅब टू लँड'पर्यंत आणून त्याचा लोकांना प्रत्यक्ष लाभ मिळाला, तरच ते खरे इनोव्हेशन मानले जाते, असे विचार राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मुंबईचे अध्यक्ष पद्मविभूषण डॉ.अनिल काकोडकर यांनी मलकापूर येथील जय सरदार एफपीओच्या 'संपूर्ण पशू आहार' प्रकल्पाच्या शुभारंभ प्रसंगी व्यक्त केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतूक केलेल्या जय सरदार एफपीओच्या माध्यमातून आयआयटी मुंबईच्या संयुक्त विद्यमाने व कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली कपाशीच्या पऱ्हाटीपासून 'संपूर्ण पशू आहार' हा नाविन्यपूर्ण प्रकल्प उभारण्यात आला. या प्रकल्पाचा शुभारंभ मोताळा तालुक्यातील भोरटेक येथे दि १५ मार्च रोजी पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीप नाफडे, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग सचिव डॉ. नरेंद्र शहा, महाराष्ट्र पशुसंवर्धन व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे, आत्माचे प्रकल्प संचालक पुरुषोत्तम उन्हाळे, संचालक डॉ. शरद उपाध्ये, डॉ. अतुल ढोक, आयआयटी मुंबईच्या प्रा. मधू विंजामुर, डॉ. सुहास झांबरे, बायफचे डॉ. मनोज आवारे, जय सरदार एफपीओचे सीईओ आशिष नाफडे, कृषी विकास संस्थेचे सीईओ अमित नाफडे, शास्त्रज्ञ, अधिकारी आणि प्रवर्तक संचालक तसेच दुग्ध व्यवसायिक आणि शेळीपालक शेतकरी उपस्थित होते.

यावेळी तज्ज्ञ मान्यवरांनी मनोगतून अनेक महत्वपूर्ण माहिती विशद करुन मार्गदर्शन केले. हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी नव्या संधी निर्माण करणारा ठरेल आणि दुग्ध उत्पादक व शेळीपालकांसाठी लाभदायक ठरेल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.

भारतात मोठ्या प्रमाणावर कापसाचे उत्पादन घेतले जाते, परंतु मोठ्या प्रमाणात त्याचे अवशेष जाळले जातात. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते आणि पर्यावरणालाही हानी पोहोचते. या समस्येच्या समाधानासाठी कपाशीच्या पेंढ्याचा उपयोग करून गायी आणि बकऱ्यांसाठी संपूर्ण पशू आहार निर्मितीचा हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

या प्रकल्पासाठी आयआयटी मुंबई, आरजीएसटीसी, माफसू, इफाड, एक्सेस डेव्हलपमेंट सर्व्हिसेस, बायफ, एचडीएफसी बँक, सी-सेफ, एफ.डब्लू.डब्लू.बी., जिल्हा प्रशासन आणि इतर भागीदार संस्थांनी सहकार्य केल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांनी राज्याचे वातावरण खराब केले : खासदार राऊत यांची टिका



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज युगपुरुष महाराष्ट्र नव्हे तर, संपूर्ण भारत वर्षाचा प्रतिष्ठा, सन्मान अशा शिवाजी महाराजांची आज जयंती आहे आणि ती संपूर्ण देशात जगभरात साजरी केली जाते. छत्रपती शिवाजी महाराजांनी या महाराष्ट्राला इतिहास निर्माण करून दिला. छत्रपती शिवाजी महाराज नसते तर महाराष्ट्राला इतिहास नसता. शिवाजी महाराज आणि त्यांच्या विचाराने महाराष्ट्राने कायम इमान राखवा, अशी आमची सर्वांचे भूमिका असते, हे राज्य शिवाजी महाराजांच्या नावाने चालले. विचाराने चालले आहे का हा कायम प्रश्न आहे ? महाराष्ट्र मंत्रिमंडळात त सात ते आठ मंत्र्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचे वातावरण खराब केले आहे. अशी टीका खासदार संजय राऊत यांनी माध्ययमांशी बोलताना केली. यावेळी खासदार संजय राऊत म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे सगळ्या जाती धर्माचे आणि पंथांचे आहेत हे पथ्य आपण सर्वांनी पाळले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अन्यायाविरुद्ध लढण्याचा गद्दारी, बेइमानी विरुद्ध हल्लाबोल करण्याचे काम शिवाजी महाराजांनी केले. शिवाजी महाराजांची पहिली लढाई ही चंद्रबा मोरे यांच्याशी झाली, औरंगजेब याच्याशी नाही किंवा कोणत्या खानशी नाही, आधी शिवरायांनी आपल्या आसपासचे बेईमान आणि गद्दार होते. त्यांना तलवारीच पाणी दाखवले मग ते मुघलांच्या विरुद्ध लढण्यासाठी मोकळे झाले. महाराष्ट्रात हे पथ्य आजही पाळतो. कल्याणचा प्रश्न आहे काय वादग्रस्त देखावा असू शकतो.छत्रपती शिवजयंती निमित्ताने तिकडच्या आमच्या शिवसैनिकांनी एखादा देखावा निर्माण केला असेल तर, त्याच्यामध्ये पोलिसांनी किंवा सरकारने आक्षेप घ्यावा असं काय ज्याच कल्याणाला कधी अफजलखानाच्या देखाव्यावरून वाद झाले तर कधी शाहिस्तेखान देखाव्यावरून वाद झाले.अन्य काही चित्रांवरून वाद झाले. आता जर कोणी या महाराष्ट्रातील गद्दारी बेइमानी हे शिवरायांना कधीच मान्य नव्हती त्याच्यावर काही देखावा किंवा चित्र निर्माण केले असेल तर, पोलिसांना हस्तक्षेप करण्याची गरज नाही. या देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. या देशात लोकांच्या जीवनावर आणि सांस्कृतिक कार्यक्रमावर विशेषतः शिवरायांच्या कार्यक्रमावर सेन्सरशीप लागल्याचे जाहीर केले नाही. पोलिसांनी नरेंद्र मोदी यांच एक कालचा ब्रॉडकास्ट ऐकावे त्यांनी फार जोरदारपणे सांगितले आहे टीका सहन केली पाहिजे. कोणी टीका जरी केली असेल कार्यक्रमातून तर पोलिसांनी ते देखावे उद्धस्त करण्याचे कारण नाही. याचा अर्थ पोलीस सरकारचे आदेश पाळत नाही, पोलीस बंड करत आहेत. सुप्रिया सुळे यांचा गौप्य स्पोट याबाबत मी कसे काय सांगणार, महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये असे अनेक पात्र आहेत की ज्या पात्रांची अनेक चेहरे समोर येत आहेत. मुंडे यांच्या बळी गेला अजून काही अशा प्रकारचे जयकुमार रावल यांनी रावल को ऑपरेटिव्ह बँकेमध्ये जे घोटाळे करून ठेवले आहेत. कोट्यावधी रुपयांचे हे अत्यंत गंभीर आहेत. जनतेचा पैसा कशाप्रकारे खोटी कर्जदार कुटुंबात निर्माण करून कोट्यावधी रुपये कसे लागले हे प्रकरण देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मी पाठवणार माझ काम चालू आहे. विचारणार आहे तुम्ही तुमच्या आसपासच्या लोकांना जनतेचा पैसा लुटायला परवाना दिलेला आहे का ? जयकुमार रावल अत्यंत भ्रष्ट कारभार करणारे हे मंत्री आहेत. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची जमीन या महाशयाने लाटली. राष्ट्रपतींची जमीन लाटण्यापर्यंत यांनी हिम्मत केली, हाय कोर्टाने आता त्याच्यावरती ताशेरे मारले. या लूट मारीवर. असे मंत्री सरकारमध्ये आहेत असे एक नाही असे किमान सात ते आठ मंत्री या सरकारमध्ये आहेत. त्यांनी या महाराष्ट्राचे वातावरण खराब केले. अशा मंत्र्यांचे बळी जाणारच आणि हे बळी घेण्यासाठी आम्हाला भारतीय जनता असे काही लोक हत्यार पुरवत आहेत त्यांचा मी आभारी आहे.भारतीय जनता पक्षाच्या लोकांची राज्य करण्याची पद्धत ही नक्कीच कपट आणि कारस्थानाची आहे. कपट आणि कारस्थान राजकारणात कोणी आणला असेल अत्यंत क्रूर पद्धतीने भारतीय जनता पक्षाच्या लोकांनी आणले. आपल्या विरोधकांना तुरुंगात टाकणं, विरोधकांच्या कुटुंबीयांच्या परिवाराचा छळ करणे अशा अनेक गोष्टी केल्या, हल्ले करणे हल्ले घडविणे बदनामी करणं या देशातल्या राजकारणातील सुसंस्कृतपणा हा भारतीय जनता पक्षाने आणि त्यांच्याबरोबरच्या लोकांनी पूर्णपणे खतम केला आहे सत्य आहे. नरेंद्र मोदी असतील, अमित शहा असतील, महाराष्ट्रात अत्यंत देवेंद्र फडणवीस यांनी एक नवीन निर्माण केलेला पॅटर्न आहे. मागील पाच वर्षात आम्ही अनुभवले आहे पाहिले आहे. आता महाराष्ट्र काँग्रेसच्या अध्यक्षांनी त्यांना जी उपमा दिली आहे ते त्यांच मत आहे. पण हे बोलण्याची वेळ आपल्या राजकीय विरोधकांवर का येते त्याच आत्मचिंतन भारतीय जनता पक्षाने केले पाहिजे. हर्षवर्धन सकपाळ औरंगजेब म्हटले तर, भाजपचे लोक त्यांना अफजल खान म्हणतात बाकी काय चंगेज खान म्हणतील तुम्ही तुमच्या राज्यकारभारात सुधारणा केली पाहिजे, आज छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आहे.त्यांचा विचार तुम्ही मान्य करा, सगळ्यांना एकत्र घेऊन त्यांनी राज्य बनवलं. हिंदवी स्वराज्य बनवलं म्हणून हे राज्य निर्माण झाले आणि टिकले पाहिजे. अशा प्रकारे देवेंद्र फडणवीस आणि मोदी शिवरायांचा नाव घेऊन राज्य करत आहेत, तसे राज्य त्यांनी कधीही केलं नाही. महाराष्ट्रात देशात राज्य कोणाचे आहे? त्यांच्याच पक्षाच आहे ना, मोदी आणि देवेंद्र फडणवीस हे कोणाचे आहेत.या विचारांच्या लोकांचे आहेत हिंसक हिंदुत्वाचे आहे, मग त्यांना अडवले कोणी कबर हटवायला. शासनाने हटवावी ना मारामाऱ्या कशाला करता, नाटकं कशाला करता लोकांना त्रास का देता सांगा आरएसएस ला फर्मान काढा म्हणून.बजरंग दल, विश्र्व हिंदू परिषद ही आरएसएसची भाजपची पिल्लं आहेत, मग हे सगळं वातावरण खराब करून लोकांना त्रास देण्यापेक्षा तुम्ही शासकीय अध्यादेश काढा हिमंत आहे का काढण्याची?असा प्रश्न राऊत यांनी केला. याक्षणी औरंगजेब कबरीच्या भोवती केंद्र सरकारच पोलीस दल आहे. मग ते का ठेवला आहे. संरक्षणासाठी, केंद्र सरकारचा पोलीस दल आणि ती जागा सरकारच्या आख्याधारित आहे. आजचा अग्रलेख वाचा सामनाचा. छत्रपती शिवाजी महाराजांनी काय शौर्य या महाराष्ट्राला देशाला दाखवलं त्याचे स्मारक म्हणजे औरंगजेबाची कबर. महाराष्ट्रावरती हल्ला करणारे किंवा हल्ला करायला येणारी व महाराष्ट्राचे पंगा घेण्याआधी त्या व्यक्तीने संभाजीनगरला जाऊन आणि औरंगजेबाची कबर पहावी मग महाराष्ट्राच्या वाट्याला यावं असं आम्ही सांगतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबाची कबर खणलेली आहे ते कबर बघा, आणि मग महाराष्ट्राच्या नादाला लागा हा इतिहास आहे. ज्याला इतिहासाचे भान नाही असे सगळे इतिहासाच्या बाबतीत रंडके असलेली लोक आहेत ते हे करत आहेत.अफजलखानाचा कोथळा महाराजांनी काढला इतिहासाला ते पिढीला माहिती पाहिजे. असे मत खासदार संजय राऊत यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## संक्षिप्त...

### भिवंडीत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी /प्रतिनिधी :** भिवंडीत सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील छ. शिवाजी नगर ते छ. शिवाजी महाराज चौक अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ढोल ताशा डीजे व तारफा नृत्य सादर करत ही मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणूकीत छत्रपती शिवाजी महाराज तसेच राजमाता जिजाबाई व इतर महापुरुषांच्या वेशभूषा साकारण्यात आल्या होत्या. शेकडो शिवभक्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या मिरवणुकीत यावेळी उपस्थित होते.

### हनुमान चालीसा पठण प्रकरणाची सुनावणी एक महिना तहकूब



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई /प्रतिनिधी :** हनुमान चालीसा पठण प्रकरणी माजी खासदार नवनीत राणा आणि रवी राणा यांच्या याचिकेवरील सुनावणी १७ एप्रिल पर्यंत तहकूब करण्यात आली आहे. दोषमुक्तीसाठी दोघांची उच्च न्यायालयात धाव घेतली होती.तांत्रिक कारणास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात आली. मुंबई पोलीसांनी दाखल केलेला गुन्हा रद्द करण्यासाठी राणा दांपत्याची हायकोर्टात याचिका, सुनावणी पार पडली. महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या 'मातोश्री' या घराबाहेर हनुमान चालिसा पठणाचं आंदोलन पुकारल्याबद्दल नवनीत कौर राणा आणि त्यांचे पती रणी राणा यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला होता. राणा दांपत्याला कायदा आणि सुव्यवस्था न बिघडवता हे आंदोलन न करण्याबाबत मुंबई पोलिसांनी सीआरपीसी कलम १९२ अंतर्गत नोटीस बजावली होती.मात्र, तरीही याबद्दल मीडियात प्रक्षोभक वक्तव्य करणाऱ्या राणा दांपत्याविरोधात मुंबई पोलिसांनी आयपीसी कलम १५३-, ३४,३७ सह मुंबई पोलीस कायदा १३५ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. नंतर आयपीसी कलम १२४ - अंतर्गत राजद्रोहाचा गुन्हाही वाढवण्यात आला होता. २३ एप्रिल २०२२, शनिवारी आंदोलनाच्या दिवशी संध्याकाळी या प्रकरणात राणा दांपत्याला खार पोलीसांनी अटक करून रविवारी वांद्रे दंडाधिकारी कोर्टापुढे हजर केलं होते. तेव्हा कोर्टानं त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली, त्यानुसार राणा दांपत्याची कारागृहात रवानगी करण्यात आली होती.पुढे आठवड्याभरानं मुंबई सत्र न्यायालयाने या दोघांना याप्रकरणी सशर्त जामीन मंजूर केला होता.

### हर्षवर्धन सपकाळ यांची पक्ष बुडवण्यासाठी नेमणूक नारायण राणे यांची टिका



**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** काँग्रेस पक्ष वाढवण्यासाठी हर्षवर्धन सपकाळ यांची नेमणूक झाली नाहीये तर, पक्ष बुडवण्यासाठी त्याची नेमणूक झालेली आहे.अशी टिका खासदार नारायण राणे यांनी माध्यमांशी बोलताना केली. यावेळी पुढे बोलताना खासदार नारायण राणे म्हणाले की, सरकारने निर्णय घ्यायला पाहिजे ना! कोल्हे किंवा राष्ट्रवादीचे जयंत पाटील म्हणजे सरकार नाही. कायद्याचं स्वरूप करायचे असेल सरकारने आदेश काढण्याची गरज आहे. समुद्रत तेल साठे सापडले असतील तर चांगली गोष्ट, त्याचा सर्व्हे होऊ देत, किती खाली तेलसाठा आहे.समजू दे मालवणसाठी आणि महाराष्ट्रासाठी चांगली गोष्ट आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ मूर्ख माणूस आहे. औरंगजेब कोण होता? महाराष्ट्रामध्ये त्याच्याबद्दल काय लोक म्हणतात हे सगळ्यांनाच माहीत आहे. औरंगजेबाची उपमा आताच्या सरकारमध्ये आमच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्यावर बोलणं मग या मूर्ख माणूस असला, पाहिजे त्याला या राज्यातले प्रश्न माहित नाहीये. कोणत्या विषयावर अध्यक्ष पदाचा उपयोग करायचा आहे. त्याला माहित नाही. काँग्रेस पक्ष वाढवण्यासाठी हर्षवर्धन सपकाळ यांची नेमणूक झाली नाहीये तर, पक्ष बुडवण्यासाठी त्याची नेमणूक झालेली आहे.अशी टिका खासदार नारायण राणे यांनी माध्यमांशी बोलताना केली.

# नवी मुंबईमध्ये माजी आ. संदीप नाईक यांच्या नेतृत्वात जनता दरबार; प्रश्न सोडविण्याचे दिले आश्वासन

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई /प्रतिनिधी :** नवी मुंबईमध्ये माजी आमदार संदीप नाईक यांच्या नेतृत्वात जनता दरबार भरवण्यात आला होता. बेलापूरमध्ये जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले असून, शेकडो नागरिक आपल्या समस्या घेऊन या जनता दरबारामध्ये आले होते. यावेळी सर्वांच्या समस्या ऐकून घेऊन संदीप नाईक यांनी प्रश्न सोडवण्याच आश्वासन दिले आहे.

जनसंवाद दरबाराच्या माध्यमातून बेलापूरमधील नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहचवण्याचे काम करत आहे. प्रत्येक आठवड्यामध्ये नवी मुंबईतील नागरिकांसाठी जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांवर झालेला अन्याय अशा प्रकारचे विषय प्रशासन, सरकारपर्यंत पोहचवले गेले पाहिजे आणि त्यांचे प्रश्न सोडवण्याचे प्रामाणिक प्रयत्न संवादाच्या माध्यमातून केले जात आहे.अशी माहिती माजी आमदार संदीप नाईक यांनी दिली.

सिडकोच्या माध्यमतून घरांसाठी जो एरिया देण्याचे ठरवले होते तोच एरिया नागरिकांना मिळाला पाहिजे. जर जाहिरात आणि भरलेला फॉर्म यामध्ये काही तफावत असेल तर सिडकोने ती तफावत दूर केली पाहिजे. ज्या घरांच्या क्षेत्रफळांसाठी नागरिकांनी मागणी केली आहे, फॉर्म भरला आहे तोच एरिया नागरिकांना मिळाला पाहिजे. सिडकोने अशा प्रकारची कपात करू नये, अशा मागणीचे पत्र मुख्यमंत्री उपमुखमंत्री आणि सिडको यांना दिले आहे.

- त्यामुळे आता सिडको अशा प्रकारची तफावत, फसवणूक यापुढे सिडको नागरिकांना दिलेल्या घरात करणार नाही, जर केली तर आम्हाला याविरोधात आंदोलन उभारावे लागेल.नवी मुंबई विमानतळ सुरु होणं ही सगळ्यांसाठी आनंदाची बाब आहे.

स्व. दी.बा पाटील यांचं नाव नवी मुंबई विमानतळाला देण्यात यावं ही सगळ्यांची मागणी असून विमानतळामुळे नवी मुंबई शहराच महत्वं वाढणार आहे. असे मत यावेळी माजी आमदार संदीप नाईक यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर पकडले ८.४७ कोटी रुपयांचे सोने

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई /प्रतिनिधी :** मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी चार प्रकरणांमध्ये मिळून एकूण १०.९२३ किलो वजनाचे सोने पकडलं. या सोन्याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत ८.४७ कोटी रुपये आहे. या चार प्रकरणांमध्ये पाच जणांना अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्यांपैकी ३ जण विमानतळावरील खासगी कंपनीचे कर्मचारी आहेत.

# औरंगजेबाची कबर दुर्दैवाने आमच्या येथे : माजी खासदार चंद्रकांत खैरे

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** औरंगजेबाने हिंदूंना त्रास दिला. हिंदूंची मंदिर तोडली. या व्यक्तीची कबर दुर्दैवाने आमच्या येथे आहे. अशी खंत माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी येथे आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केली. यावेळी बोलताना माजी खासदार चंद्रकांत खैरे म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराजांना सोनेरी महाल मध्ये कैद केले होते.यामुळे बाळासाहेब ठाकरे यांनी शहराच नाव छत्रपती संभाजीनगर ठेवायचं ठरवले. आज जे सुरू आहे, ती नौटंकी सुरू आहे. राजकारण करण्यासाठी हे सुरू आहे. इतर जिल्ह्यात आंदोलन सुरू असल्याने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लोक भयभीत झाले आहेत. दरवर्षी खुलताबत येथील भद्रा मारुती मंदिरात १० लाख लोक येतात. मात्र, आता मंदिराची गर्दी ५० टक्के कमी झाली आहे.वातावरण खराब झाल्याने लोक भयभीत झाले आहेत.हे प्रकार सुरू झाल्याने हनुमान जयंती बंद करायची का? कबर कबर करण्यापेक्षा हनुमान जयंती एवढ्या जल्लोषात साजरी करा की, कबर पळून जाईल.कबर काढावी की नाही यावर मी बोलणार नाही, याबाबत निर्णय मुख्यमंत्र्यांनी घ्यावा. असे मत माजी खासदार संजय खैरे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



कायदा आणि सुव्यवस्था बिघडू नये यासाठी खुलताबाद येथील औरंगजेब याच्या कबर स्थळावर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अशी माहिती पोलीस अधीक्षक विनय कुमार राठोड यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी बोलताना पोलीस अधीक्षक राठोड म्हणाले की, खुलताबाद येथे पुरेपूर बंदोबस्त लावण्यात आला आहे.त्यामुळे कायदा सुव्यवस्था खराब होणार नाही याची पूर्ण काळजी घेतलेली आहे. ज्या नावांची माहिती आम्हाला मिळालेली आहे त्यांना आम्ही जिल्हा बंदी आदेश लागू केलेले आहेत.संपूर्ण जिल्ह्यामध्ये ६०० च्या जवळपास अधिकारी कर्मचारी असा बंदोबस्त लावण्यात आला आहे.प्रत्येक तहसील कार्यालय आणि महत्त्वाच्या ठिकाणी अशा प्रत्येक ठिकाणी बंदोबस्त देण्यात आला आहे. कायदा सुव्यवस्था खराब होईल, असा कोणीही प्रयत्न करू नये, असे आवाहन पोलिस अधीक्षक विनय कुमार राठोड यांनी यावेळी केले.

### शहरात संवेदनशील ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात : जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** औरंगजेब कबर हटविण्याची मागणी काही संघटनांकडून होत आहे. त्यामुळे शहरातील संवेदनशील ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. अशी माहिती छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले की, मागील काही दिवसांपासून औरंगजेब यांची कबर हटवण्याची चर्चा सुरू आहे. सदर प्रकरण संवेदनशील असल्याने व यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडून यासाठी पोलीस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात वाढवलेला आहे. विविध प्रतिबंधात्मक आदेश आम्ही जिल्ह्याभरामध्ये लागू केलेले आहेत. शहरात देखील संवेदनशील ठिकाणी पोलीस बंदोबस्त लावला आहे. काहींनी या ठिकाणी जाऊन निदर्शने आंदोलन करण्यासंदर्भात निवेदन दिले होते, त्या दृष्टिकोनातून देखील आम्ही पावले उचलले आहेत. पोलीस आयुक्त पोलीस अधीक्षक व तालुकास्तरावरील सर्व अधिकारी कर्मचारी या विषयावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. विविध ठिकाणी प्रतिबंधात्मक आदेश काढण्यासंदर्भात देखील सूचना दिल्या आहेत.कायदा व सुव्यवस्था कुठेही यासाठी प्रशासन पूर्णपणे प्रयत्न करत आहे. प्रतिबंधात्मक आदेश असताना बाहेरच्या जिल्ह्यातील काही मंडळी आली होती. काल आम्ही मिस्टर एकबोटे म्हणून कोणीतरी आले होते. त्यांना आदेश दिले आहेत. त्या अगोदर सांगलीतून काही मंडळी येण्यासंदर्भात बातम्या आल्या होत्या.त्यामुळे प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.अशी माहिती जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# भाजापाचे काही नेतेच देवेंद्र फडणवीसांची तुलना क्ररकर्मा औरंगजेबाशी करत आहेत

## काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची भाजपवर टिका

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात सध्या ज्या क्रूर पद्धतीने कारभार सुरु आहे तो अत्यंत वाईट आहे. संतोष देशमुखांची निघृण हत्या, स्वारगेट बलात्कार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महिला अत्याचाराचे प्रकार पाहता राज्यातील फडणवीस सरकारचा कारभार हा औरंगजेबाच्या कारभारासारखाच आहे. या विधानातून दोन शासकांच्या कारभाराची तुलना केलेली आहे, व्यक्तींची नाही, असे असतानाही भाजापाचे काही नेतेच फडणवीस यांची तुलना क्ररकर्मा औरंगजेबाशी करत आहेत, असे सडेतोड उत्तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहे. गांधी भवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, औरंगजेबावर बोलल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांना पोटदुखी का झाली. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा एकेरी उल्लेख केला नाही, त्यांच्याबद्दल अपशब्द वापरला नाही. तरीही भाजपाचे नेते माझ्यावर अत्यंत खालच्या पातळीवर टीका करत आहेत. औरंगजेब व फडणवीस यांच्या कारभाराची तुलना केली तर, भाजपाचे नेते फडणवीसांची तुलना औरंगजेबाशी केली.असा कांगावा करत देवेंद्र फडणवीस यांनाच औरंगजेब ठरवत आहेत. काल रत्नागिरीत आणि त्यापूर्वी ९ मार्च रोजी बीड जिल्ह्यात सद्भावना यात्रेदरम्यानही मी हेच विधान केले होते, असेही सपकाळ म्हणाले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विधानाचा समाचार घेत हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कारभारावर टीका केली. तर, मराठी अस्मितेला ठेच कशी पोहचते ते बावनकुळेंनी सांगावे. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांचा अपमान केल्यानंतर मराठी अस्मितेला ठेच पोहचत नाही का, कोरटकर, सोलापूरकर यांनी शिवाजी महाराजांचा अपमान केला. त्यांच्यावर बावनकुळे का बोलत नाहीत. काँग्रेस पक्षाला संस्कृती आहे, मस्साजोगचा सरपंच संतोष देशमुख हा भाजपाचा बुथ प्रमुख होता. पण त्यांच्या हत्येनंतर भाजपाचा प्रदेशाध्यक्ष बावनकुळे हे त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी सुद्धा गेले नाहीत, उलट त्यांनी मांडवली करण्याचा प्रयत्न केला. पण काँग्रेस पक्षाचा प्रांताध्यक्ष म्हणून देशमुख कुटुंबांचे सांत्वन करून तेथून सद्भावना यात्रा काढली. मी सामान्य कुटुंबातून आलो आहे.पण बावनकुळे, नारायण राणे यांनी मात्र माझ्यावर पातळी सोडून टीका केली आहे, यातून भाजपाचा खरा चेहरा पुढे आला आहे. औरंगजेब हा क्रूर शासक होता. यात दुमत नाही पण याच क्रूरकर्मा औरंजेबाला मराठी मातीत गाढले हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे शौर्य व इतिहास आहे. हा इतिहास व महाराजांचे शौर्य पुसण्याचा काही लोकांचा प्रयत्न आहे. औरंगजेब जेवढा क्रूर होता. तसेच ब्रिटीश होते मग ब्रिटीश सरकारला मदत करणाऱ्या संस्था, संघटना व नेते यांची स्मारके, पुतळे आणि संस्था उखडून टाकण्याचे धाडस बजरंग दल व विश्व हिंदू परिषद करणार का? असा प्रश्न काँग्रेस प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.



# पिंपरी गवळीच्या शेकडो महिला-पुरुषांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात दिली धडक





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्याच्या मोताळा तालुक्यातील पिंपरी गवळी गावामध्ये एका महिन्यात दोन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याच्या घटना घडल्या आहेत. तर दोन वर्षात जवळपास सात मुली बेपत्ता झाल्याच गावकऱ्यांनी सांगितले आहे. अजूनही या मुलीचा शोध पोलिसांना लागला नाही. याप्रकरणी पोलीस हलगर्जीपणा करत असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. बेपत्ता मुलीचा तात्काळ शोध घ्यावा या मागणीसाठी पिंपरी गवळी गावातील शेकडो महिला पुरुषांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात धडक दिली. दरम्यान, महिला मुलींचे संरक्षण करण्यात हे सरकार अपयशी ठरत असल्याचा आरोप उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या नेत्या जयश्री शेळके यांनी केला आहे.

# उमरखेड ते हरदडा रस्त्याचे काम त्वरित करा

## काँग्रेस तर्फे रास्ता रोको आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

■ महेबूब शेख

**उमरखेड :** हरदडा ते उमरखेड रस्त्याचे काम त्वरित करण्यात यावे यासाठी निवेदन देऊन सुद्धा कोणतीही कारवाई न झाल्यामुळे आज दि १७ रोजी काँग्रेस कमिटी व अनुसूचित जाती विभागाच्या वतीने हरदडा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले .यावेळी दोन्ही बाजूने वाहतूक ठप्प झाली होती . रस्ता त्वरित सुरू करण्याच्या प्रशासनाच्या आश्र्वासनानंतर रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले . उमरखेड ते हरदडा रस्ता मागील दोन वर्षापासून मंजूर असून या रस्त्यामुळे ढाणकी ते उमरखेड प्रवास करताना नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून आजार होत आहे.तसेच या खराब रस्त्यामुळे अपघाताची मालिका सुरू असून मागील दोन वर्षापासून हरदडा ते उमरखेड हा रस्ता मंजूर आहे त्यापैकी उमरखेड पासून विडूळ जवळ २ कि. मी पर्यंत डांबरीकरण झाला आहे त्याच्या पुढील रस्ता अतोनात खराब असून ढाणकी उमरखेड प्रवास करत असतांना दुचाकी वाहण धारक यांचा मानेचा व कमरेच्या आजारमुळे अतोनात त्रास होत असून त्या रस्त्यामुळे कधी कोणती दुर्घटना घडेल सांगता येत नाही. तेव्हा सदर रस्त्याचे काम त्वरीत सुरू करण्यासंदर्भात दि.१५ मार्च पर्यंत कार्यवाही करावी व जाणे-येणे करणाऱ्या नागरीकांचा होणार त्रास थांबवावा. अन्यथा अनु. जाती कांग्रेस कमीटी तर्फे दि. १७ मार्च तिव्र चक्काजाम आंदोलन छेडण्याचा इशारा उपअभियंता यांना २५ फेब्रुवारी रोजी दिलेल्या निवेदनातून देण्यात आला होता परंतु या संदर्भात कोणतीही कारवाई न झाल्याने अखेर आज रस्ता रोको आंदोलन करण्यात आले रस्त्याचे काम त्वरित सुरू न केल्यास परत आंदोलन छेडण्याचा इशारा आंदोलनकर्तांनी दिला आहे . यावेळी काँग्रेस कमिटीचे अनुसूचित जाती विभागाचे कार्यकारी अध्यक्ष रामराव गायकवाड यांच्या नेतृत्वात केलेल्या आंदोलनात कैलास राऊत मिलिंद चिकाटे मिलिंद धुळे रवींद्र दवणे प्रणिता कांबळे सचिन कांबळे भीमराव धुळे दिगंबर घुंगरे लक्ष्मण घोगरे गजानन मिटकरे अमोल तुपेकर शेख बिबन जाबाज सर नवाब सह अनेक कार्यकर्ते सामील झाले होते .

# आजपासून दोन दिवसीय ग्रंथोत्सव; ग्रंथविक्री, प्रदर्शनी व विविध बहुरंगी कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे दि. १८ आणि १९ मार्च २०२५ रोजी दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गर्दे वाचनालयाच्या सभागृहातील या ग्रंथोत्सवात वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी ग्रंथप्रदर्शन, ग्रंथविक्री, कविसंमेलन, व्याख्याने, तसेच विविध बहुरंगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरूवार, दि. १८ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता हुतात्मा स्मारकापासून गर्दे वाचनालयापर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. साहित्यीक अर्चना देव यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्घाटन होणार आहे. यावेळी नगर परिषदचे मुख्याधिकारी गणेश पांडे, शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, गर्दे वाचनालयाचे अध्यक्ष गोकुल शर्मा उपस्थित राहतील.

सकाळी ११ वाजता उद्घाटन समारंभ केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण आणि आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी विशेष अतिथी केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे मदत व पुनर्वसन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील, कामगार मंत्री आकाश फुंडकर तसेच आमदार किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, धिरज लिंगाडे, चैनसुख संचेती, डॉ. संजय कुटे, संजय गायकवाड, श्र्वेता महाले, सिद्धार्थ खरात, मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलिस अधिक्षक विश्र्व पानसरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर आदी उपस्थित राहणार आहेत.

दुपारी २.३० ते ५ वाजेदरम्यान अभिजात मराठी भाषा आणि आपली जबाबदारी या विषयावर डॉ. एस. एम.कानडजे यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान होणार आहे. यामध्ये डॉ. गजानन जाधव, डॉ. कि.वा. वाघ, सुनिल वायाळ, नेमीनाथ सातपुते सहभागी होतील.

ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दि. १९ मार्च रोजी सकाळी ११ वाजता कृत्रीम बुदधीमत्ता वाचन संस्कृतीवर होणारा परिणाम या विषयावर प्रा. कमलेश खिल्लारे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद. प्रमुख वक्ते डॉ.अरुण नन्हई, महेंद्र बोर्डे सहभागी होतील. दुपारी १.३० वाजता वाचन चळवळीमध्ये सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान या विषयावर डॉ.अनंत सिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. राजेंद्र गणगे, देविदास समुद्रवार, सुनिल झोरे, अनंत सातव, रामेश्र्वर गायकी, विष्णू इंगळे सहभागी होतील. दुपारी ३ वाजता डॉ. सुनिल पवार यांच्या अध्यक्षतेखाली कवि संमेलन. यामध्ये नितीन वरणकार, अरविंद शिंगाडे, राम सोनोने, सर्जेराव चव्हाण, कडुबा बनसोडे, धनंजय मऱ्हे सहभागी होतील.

दोन दिवशीय ग्रंथोत्सवाला जिल्ह्यातील ग्रंथालय कर्मचारी आणि पदाधिकारी तसेच नागरिकांनी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी राजेश पाटील यांनी केले आहे.

# बुद्धगया येथील महाबोधी महाविहार गैर बौद्धांच्या ताब्यातून मुक्त करा

## लोणार तालुका भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने बिहारचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ




**मेहकर/प्रतिनिधी :** बुद्धगया येथील महाबोधी महाविहार गैर बौद्धांच्या ताब्यातून मुक्त करण्यात यावे अशी मागणी १७ मार्च २०२५ रोजी भारतीय बौद्ध महासभा लोणार तालुका वतीने तहसीलदार यांच्या मार्फत बिहार राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे केली. निवेदनात नमूद केले आहे की, बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे जगभरातील बौद्ध धर्मीयांचे श्रद्धास्थान व पवित्र स्थळ आहे. भारतातील अन्य धर्मियांचे धार्मिक स्थळे हे त्या त्या धर्मीयांच्या नियंत्रणाखाली आहे. परंतु बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे बौद्ध धर्मीय स्थळ असून सुद्धा गैर बौद्धांच्या ताब्यात आहे आणि म्हणून महाबोधी महाविहार बौद्धांच्या नियंत्रणाखाली यावे, अशी मागणी भारतीय बौद्ध महासभा लोणार तालुक्याच्या वतीने सदर निवेदनातून करण्यात येत आहे. शिवाय बिहार सरकारने महाबोधी महाविहार अधिनियम १९४९ हा कायदा पूर्णपणे रद्द करण्यात यावा, आणि महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन पूर्णपणे बौद्ध धर्मीयांच्या हाती सोपवावे अशी मागणी सदर निवेदनात करण्यात आली. या मागणीला विविध बौद्ध संघटना ,राजकीय पक्ष, राजकीय संघटना यांनी सुद्धा आपला पाठिंबा दिला. निवेदन सादर करताना बौद्ध महासभेचे सदाशिव साबळे, राहुल अंभोरे, नागवंशी संघपाल पनाड, मेहकर-लोणार विधानसभा नेते, सुधाकर वानखडे, ,सरस्वती साबळे, तुळशीदास घेवंदे, विजय सरकटे सर, रत्नमाला मुळे, वैशाली खरात, आम्रपाली तुरुकमाने, अर्चना कांबळे ,पंचशीला मोरे, उषाताई नरवडे, रिपब्लिकन नेते संघपाल पनाड,वंचितचे ज्येष्ठ नेते डॉ. के. बी. इंगळे, दीपक अंभोरे, महेंद्र मोरे , इतर पक्ष संघटनेचे सुदन अंभोरे, तानाजी अंभोरे, समाधान सरदार, तुकाराम साळवे जी.के. तुरुकमाने प्रतीक्षा गवई ,पल्लवी मोरे, नंदा सरकटे ,रत्नमाला इंगोले, छाया भालेराव, रेखा ससाने ,उषा अंभोरे, सुरेखा भगत, कुसुम मोरे ,रुक्मिणी कांबळे, अलका घेवंदे ,स्नेहलता गवई, भारती अवसरमोल तथा समस्त बौद्ध समुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विविध वृत्त...

### क्षुल्लक कारणावरून तरुणाची चाकू भोसकून हत्या, आरोपी अटकेत



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** धंतोली पोलीस स्टेशन हद्दीत राहुल नगर चौकात काल रात्री दारू पिऊन आयुष मंडपे हा शिविगाळ करत होता. घरी जात असताना अंकुश देवगिरकर याने आयुषला हटकले. त्यावरून दोघांमध्ये वाद सुरू झाला. एकमेकांना शिविगाळ करत हा वाद वाढत गेला. आयुषने धावत घरी जाऊन चाकू आणला आणि अंकुशच्या पोटावर आणि पाठीवर चाकूने वार केले. यात अंकुश देवगिरकर याचा मृत्यू झाला. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी आयुषला ताब्यात घेऊन चौकशीला सुरुवात केली आहे.

### विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्यावतीने धरणे आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** राज्य सरकारने काढलेला १५ मार्चचा संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करा, शिक्षक सेवक पद रद्द करा, सर्व समित्या रद्द करून एकच शाळा व्यवस्थापन समिती ठेवा, शालेय परीक्षा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात घ्या, इत्यादी मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्यावतीने गोंदियाच्या जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी कमी पटसंख्येच्या शाळांना बंद करू नये या प्रमुख मागणी सह अन्य विविध मागण्यांना घेऊन या आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी मोठ्या संख्येने शिक्षकांनी एकत्रित येत सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली.

### जिल्हाधिकारी कार्यालयावर शिक्षक समितीचे धरणे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** शासन निर्णयाच्या विरोधात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने आज अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. या निर्णयामुळे शिक्षकांच्या संख्येत घट होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप समितीने केला आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने शिक्षक सहभागी झाले होते. १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार २०२४-२५ संच मान्यता अंतिम करण्यात आली असली, तरी त्यात शिक्षण कायद्याच्या तरतुदींचा भंग होत असल्याचे शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे. या निर्णयामुळे अनेक शिक्षक अतिरिक्त होतील, परिणामी शाळांमध्ये पुरेसे शिक्षक उपलब्ध राहणार नाहीत. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या गावातील शाळांमध्ये शिक्षण घेण्याचा हक्क नाकारला जात आहे. यासंदर्भात २५ फेब्रुवारी २०२५ रोजी निवेदन सादर करण्यात आले होते. मात्र, कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने शिक्षकांनी आंदोलनाचा निर्णय घेतला. शिक्षकांनी जोरदार घोषणाबाजी करत शासनाने तात्काळ निर्णय मागे घ्यावा व शाळांमध्ये आवश्यक शिक्षक संख्या पुरवावी, अशी मागणी केली. शिक्षण विभागाने या मागण्यांची दखल घ्यावी अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### विदर्भात २० ते २३ मार्च दरम्यान अवकाळी पावसाची शक्यता, हवामान तज्ञांची माहिती

**अमरावती/प्रतिनिधी** अमरावती शहरासह जिल्ह्यात आज ४० डिग्री तापमानाची नोंद झाली. त्यामुळे अमरावती शहरात रस्ते निर्मनुष्य झाले आहे. यावर्षी सर्वात जास्त फेब्रुवारी महिन्यापासूनच अमरावती सह विदर्भात पारा उच्चांक गाठत आहे. मात्र, उद्यापासून अमरावती जिल्ह्यासह विदर्भात तापमात घट होणार आहे. विदर्भात २० ते २३ मार्च दरम्यान अवकाळी पावसाचा इशारा हवामान खात्याच्या वतीने वर्तवण्यात आला आहे.